संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
विद्यार्थी विकास विभाग

दुरध्वनी : ०७१२-२६६०९४७ **Email : avinashasnare@sgbau.ac.in**

क्र.संगाबाअवि/१३/ ६७ /२०१७
दिनांक : १६.०९.२०१७

प्रति,
प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

**विषयः- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात येणा-या आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे प्रवेश शुल्क व प्रवेशिका विलंबाने स्विकारण्यात येत असल्याबाबत**

**संदर्भः-** मा. कुलगुरू महोदयांनी दिनांक १५.०९.२०१७ रोजी प्रदान केलेल्या अनुमतीनुसार

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन **दिनांक २६.०९.२०१७ ते २९.०९.२०१७** या कालावधित **जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, बडनेरा, अमरावती** येथे आयोजित करण्यात येत आहे.

या महोत्सवामध्ये सहभागी होण्याकरिता दिनांक १०.०९.२०१७ पुर्वी अथवा पर्यंत प्रवेश शुल्क व प्रवेश अर्ज पाठविण्यासंबंधी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्यांना विभागाचे दिनांक २४.०८.२०१७ व ०८.०९.२०१७ रोजीचे पत्राचे अनुषंगाने कळविण्यात आले होते. तथापि, काही महाविद्यालयांना या तारखेपर्यंत प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क विविध कारणास्तव भरता आले नाही. या संदर्भात सहभागापासून वंचित अनेक विद्यार्थी, प्राचार्य, विविध संघटनांनी मा. कुलगुरु महोदयांना प्रवेश शुल्क व अर्ज सादर करण्याकरिता मुदतवाढ मिळावी, अशी विनंती केली.

या पार्श्वभूमीवर मा. कुलगुरू महोदयांनी विद्यार्थ्यांचे भविष्याची होणारी हानी लक्षात घेऊन ज्या महाविद्यालयांनी सहभागी होण्याकरिता प्रवेश शुल्क व प्रवेश अर्ज सादर केले नाहीत त्यांचेकरिता मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असून अशा महाविद्यालयांनी खालील नमूद बाबींचा अवलंब करून प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क विद्यापीठ खाती **सोमवार, दिनांक १८.०९.२०१७ पुर्वी किंवा पर्यंत** भरावे. **यानंतर मात्र कोणत्याही सबबीवर प्रवेश अर्ज व शुल्क विद्यापीठाद्वारे स्विकारले जाणार नाहीत**, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**महाविद्यालयांनी प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क सादर करण्याकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती**

- **धनादेश अथवा धनाकर्ष पुर्वी काढला असल्यास –**

१. ज्या महाविद्यालयांनी युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याकरिता पुर्णतः भरलेले प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्काचे धनादेश अथवा धनाकर्ष यापूर्वी काढलेले असतील त्यांनी दिनांक १८.०९.२०१७ पर्यंत प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्काचे धनादेश अथवा धनाकर्ष संचालक, विद्यार्थी विकास कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत जमा करावे. महाविद्यालयांच्या सुविधेकरिता विद्यार्थी विकास विभाग रविवार दिनांक १७.०९.२०१७ रोजी कार्यालयीन वेळेत सुरू राहील याची प्रकर्षाने नोंद घ्यावी.

- **रोखीने भरणा करावयाचा असल्यास –**

२. ज्या महाविद्यालयांना प्रवेश शुल्क रोखीने भरावयाचे आहे त्यांनी दिनांक १८.०९.२०१७ रोजी पुर्वी किंवा पर्यंत वित्त विभागात **सुटीचे दिवस वगळून रोखीने भरणा करावा**. व भरणा पावती व प्रवेश अर्ज दिनांक १८.०९.२०१७ रोजी कार्यालयीन वेळेचे आंत विद्यार्थी विकास विभागात सादर करावे.

आपला विश्वासू,

(डा.आवनाश असनार)
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी – **वित्त व लेखा अधिकारी यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.**